दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.१५ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 15 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 30 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# वेळप्रसंगी छातीवर गोळ्या झेलू पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही:माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचा सरकारला इशारा

**हिंगोली (वृत्तसंस्था)**–शक्तिपीठ महामार्गाची मागणीच कोणी केली नाही त्यानंतरही सरकार महामार्ग बांधण्याच्या तयारीत आहे. मात्र वेळप्रसंगी छातीवर गोळ्या झेलू पण हा महामार्ग होऊ देणार नाही असा इशारा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शनिवारी ता. १३ सरकारला दिला आहे.शेतकरी शेतमजूर हक्क परिषदेच्या निमित्ताने वाई गोरक्षनाथ (ता. वसमत) येथे राज्यमंत्री बच्चू कडू आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना कडू म्हणाले की, राज्यात पेरणी पासून ते काढणी पर्यंतची सर्व कामे हमी योजनेमध्ये झाली पाहिजेत. तसेच कर्जमुक्ती, दिव्यांगांच्या प्रश्नांवर आमची लढाई सुरु आहे. या मागणीसाठी शेतकरी, शेतमजूर हक्क परिषद घेतली जात आहे. पुढे परभणी, नांदेड, सोलापूर येथे कार्यक्रम होणार असून जळगाव येथे मोर्चा काढला जाणार आहे. या आंदोलनानंतरही शासनाने या प्रश्नांकडे लक्ष दिले नाही तर ता. २८ रोजी बुटी बोरी (नागपूर) येथे सर्व एकत्र येऊन नागपूरला वेढा देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यापुर्वी शासनाने आमच्या मागण्यांवर निर्णय घेणे अपेक्षीत असल्याचे त्यांनी सांगितले.राज्यातील पवनार ते पत्रा देवी या सुमारे ८०२ किलोमीटरच्या शक्तिपीठ महामार्गाची कोणीही मागणी केली नाही. शेतकऱ्यांचीही मागणी नसतांना हा महामार्ग मंजूर करून शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जात आहेत. मात्र या महामार्गाला आमचा विरोध आहे. सरकारने या महामार्गाचे काम सुरु करू नये अन सुरु केलेच तर काम बंद करून वेळप्रसंगी गोळ्या झेलण्याची आमची तयारी असल्याचा इशारा कडू यांनी यावेळी दिला.

राज्यातील शेतकऱ्यांना काहीही कमी पडणार नाही असे सरकार सांगत आहे. मात्र नुकसानीचे पंचनामेच केले जात नाही त्यामुळे मदत कशी मिळणार. सरकारचे हे डुप्लिकेट बोलणे असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारने पावसामुळे नुकसानी साठी मदत जाहिर करावी, कर्जमुक्ती जाहिर करावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली. सरकार एकीकडे हमी भाव जाहिर करीत आहे अन दुसरीकडे ३४०० रुपयांनी सोयाबीन विक्री करावे लागत असेल तर हमी भावाचा अर्थ काय असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



# विद्यापीठ बीड जिल्हा युवा महोत्सव वाद-विवाद स्पर्धेत वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने बीड जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ र.भ. अट्टल महाविद्यालय गेवराई येथे नुकताच पार पडला. या युवा महोत्सवामध्ये वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणकशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वाद-विवाद स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळवल्याबद्दल संस्थाअध्यक्ष रमेश भाऊ पोकळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आणि विद्यापीठ स्तरावर होणा-या विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालय बीड या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर बीड जिल्हा युवा महोत्सवातील वाद-विवाद स्पर्धेत विद्यार्थी समर्थ सिद्धलिंग गावडे आणि बालाजी उत्तरेश्वर सराटे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सांघिक द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

या स्पर्धेत संघ संचालक म्हणून वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाचे प्रा. सुहास गाढवे यांनी विद्यार्थ्यांच्या सोबत उपस्थित राहून त्यांचे मनोबल वाढवण्याचे काम केले. या स्पर्धेसाठी प्रा. बप्पासाहेब हावळे सरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले असल्यामुळे त्यांच्या कामगिरीत अधिक चमक आली.

यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रा. बप्पासाहेब हावळे,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा. रफिक सय्यद आणि कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेनंतर समर्थ गावडे व बालाजी सराटे या विद्यार्थ्यांची विद्यापीठ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यावेळी प्रा. महेश नेवडे,प्रा.कोमल सुरवसे, प्रा.अतुल रसाळ, प्रा.अफरोज सय्यद, सौ. पोकळे,सौ.प्रिती सुरवसे, खराडे, सचिन चौरै उपस्थित होते.

# सफाळे नारोडा येथे विश्व आदिवासी दिवस साजरा

**पालघर । प्रतिनिधी**

सफाळे येथील नारोडा गावात शनिवारी विश्व आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात व उत्स्फूर्त वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला मान्यवर, कार्यकर्ते व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश भोईर उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान नथु पिलेना यांनी भूषविले. यावेळी विश्वनाथ मालकरी, देवराम धंगडा, किसन बोंबाडी, संतोष बोंबाडी, बाबू बरड, प्रकाश पाटील, प्रमोद सांबरे, सुनील कोम, बळीराम गुजर, राजन हरवटे, अविनाश भोईर यांसह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.आदिवासी अधिकार दिनाचे महत्त्व नितीन बोंबाडे यांनी उलगडून सांगितले. पुढील काळात हा दिवस आणखी मोठ्या प्रमाणावर आणि ताकदीने साजरा करू, अशी ग्वाही सुरेश भोईर यांनी दिली. तसेच आदिवासी समाजाने आपल्या रूढी-परंपरा टिकवून ठेवाव्यात व संस्कृतीचे जतन करावे, असा संदेश त्यांनी दिला.

अध्यक्षीय भाषणात नथु पिलेना यांनी समाजाने एकजूट ठेवून अशा उपक्रमांना यशस्वी करावे, असे आवाहन केले.या प्रसंगी आदिवासी समाजाचे हक्क, शासनाकडून होणारी पिळवणूक, सामाजिक-आर्थिक प्रश्न, तसेच आदिवासी संस्कृती, परंपरा व चालीरितींचे संवर्धन यावर सखोल चर्चा झाली. मान्यवरांनी आदिवासी समाजाने एकजुटीने पुढे येत आपल्या हक्कांसाठी संघर्ष करावा आणि पुढील पिढीपर्यंत संस्कृती पोहोचविण्याची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन केले.

# प्रख्यात बालरोगतज्ज्ञ डॉ.रामकृष्ण लोंढे यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील भुमी पुत्र तथा कळंब शहरातील सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी प्रदेशाध्यक्ष,रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे माजी तालुकाध्यक्ष तसेच प्रगतशील शेतकरी डॉ.रामकृष्ण लोंढे यांचे दुःखद निधन झाले.त्यांच्या निधनाची वार्ता कळताच कळंब तालुक्यासह बीड जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.डॉ.लोंढे यांनी आरोग्य,सामाजिक व कृषी अशा अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले.बीड, परभणी व धाराशिव जिल्ह्यातील बालरोग तज्ज्ञ म्हणून त्यांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले.ग्रामीण भागातील रुग्णांसाठी ते देवदूता



सारखेच होते.जिथे कुठे उपचार मिळत नसत, तिथे शेतकऱ्यांचा आधार म्हणून लोक डॉ. लोंढे यांच्यादवाखान्यात धाव घेत असत. रुग्णसेवेसोबत त्यांचे कार्य,त्यांची संवेदन शीलता आणि सेवाभाव अमूल्य होते.त्यांच्या अचानक निधनाने कळंब तालुका आणि संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.सामाजिक व वैद्यकीय क्षेत्राला मोठा धक्का बसला असून त्यांच्या स्मृतीस सर्व स्तरातून आदरांजली वाहिली जात आहे.

# स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे छायाचित्र असलेल्या बॅनरची विटंबना करणाऱ्या समाजकंटकाविरुद्ध कारवाई करण्यात यावी-वनवे

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ रावजी मुंडे साहेब यांचे छायाचित्र असलेल्या बॅनरची विटंबना करणाऱ्या समाजकंटका विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे लेखी निवेदन केज पोलीस ठाणे येथे धीरज वनवे यांच्यासह नागरिकांनी दिले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे छायाचित्र असलेले बॅनर लावण्यात आलेले होते. दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी चिंचोली माळी येथील रोहन गलांडे हा जरांगे पाटलांचा व खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचा ख़देसमर्थक आहे या व्यक्तीने सदर बॅनर काढून त्यावर मद्यधुंद अवस्थेत झोपुन आमच्या भावना दुखावले आहेत. या कृतीमुळे गावकऱ्यात प्रचंड रोष व संतापाची लाट निर्माण झाला असून सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून सदर प्रकरणी गंभीर दखल घेऊन संबंधित व्यक्तीवर भारतीय दंड विधानानुसार (आय पी सी) प्रमाणे योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच यापूर्वीचे गंभीर गुन्हे विचारात घेऊन आरोपी विरोधात यमपीडीए अथवा तडीपारीची कठोर कारवाई करण्यात यावी अशा आशयाच्या मागणीचे लेखी निवेदन देण्यात आले आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा पोलीस प्रशासनास इशारा लेखी निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे.या लेखी निवेदनावर धीरज वनवे, वैभव केंद्रे, बाळासाहेब वनवे, शशीकुमार वनवे, सचिन वनवे, परमेश्वर केंद्रे, बाळासाहेब गालफाडे, विक्रम वनवे, सुभाष फुंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**याच नराधमाने काही दिवसापूर्वी गावातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी बसलिंग आप्पा भुजबळ यांच्या स्मारकाची विटंबना केली होती व तशी तक्रारही केज पोलीस स्टेशनला करण्यात आलेली होती अशा प्रतिक्रिया नागरिकांतून ऐकण्यास येत आहेत व तेव्हाही सदर स्मारकावर बसून सदरचा युवक हा दारू पित असताना चे व्हिडिओ व्हायरल झालेले होते त्यामुळे ग्रामस्थांच्या भावना त्याही वेळी दुखावल्या होत्या त्यामुळे अशा जातियवादी युवकावर कठोरात कठोर कारवाई करावी.**




# बीडमध्ये बंजारा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या-खा.बजरंग सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

बंजारा (लमाण) समाजाच्यावतीने बीड येथे दि.१५ रोजी विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासाठी येणाऱ्या बांधवांच्या येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई, यांना दिले आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे, राज्य शासनाने दि. २ सप्टेंबर २०२५ रोजीचा शासन निर्णयानुसार हैदराबाद स्टेट गॅझेटियर स्वीकारले असून, त्या गॅझेटरमधील नोंदीनुसार बंजारा (लमाण) समाज अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात मोडतो. मराठवाड्यातील विशेषतः तत्कालीन हैदराबाद राज्याच्या भागातील बंजारा



समाजाच्या मागणीसाठी बीड जिल्हयातील संपूर्ण बंजारा समाज बांधवांनी दि. १५ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बोड येथे भव्य विराट मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चामध्ये समाज बांधव मोठ्या संख्येने आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक वाहनाने सहभागी होत आहेत. यामुळे मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी देने आवश्यक आहे. या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल . बीडकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्याच्या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत. असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. दोन दिवसापूर्वी बीड येथे बंजारा समाजातील तरुणांनी सुरू केलेल्या उपोषणाला खा.बजरंग सोनवणे यांनी भेट देत उपोषणकर्त्यांशी संवाद साधला होता. याच ठिकाणाहून आपण बंजारा समाजाच्या सोबत असून आपला या मागणीला पाठिंबा असल्याचेही जाहीर केले होते. यानंतर टोलमाफीसाठी पत्र देऊन सामन्य नागरिकांना टोलपासून आर्थिक झळ बसू नये यासाठी पत्र दिले आहे.

## आरोग्यसेवेच्या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?

# अक्कलकुवा-धडगाव तालुक्यांतील आरोग्य विभागातील रिक्त जागा त्वरित भरा

**मोलगी । रवींद्र वळवी**

सातपुड्यातील आदिवासीबहुल भागातील अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यांमधील आरोग्य सेवांची दुरवस्था चव्हाट्यावर आली आहे. आरोग्य विभागातील अनेक महत्त्वाची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने येथील गोरगरीब जनतेला मोठा फटका बसत आहे. या भागातील रुग्णांना, विशेषतः गर्भवती महिलांना आणि गंभीर रुग्णांना, वेळेवर उपचार मिळत नसल्याने त्यांचा जीव धोक्यात येत आहे. आजही या दुर्गम भागात अनेक गावांमध्ये रस्ते नाहीत. त्यामुळे रुग्णांना, गर्भवती महिलांना किंवा सर्पदंश झालेल्या व्यक्तींना उपचारांसाठी बांबूच्या झोळीतून पायवाटेने आरोग्य केंद्रापर्यंत घेऊन जावे लागते. परंतु, आरोग्य केंद्रात पोहोचल्यावरही अनेकदा अपुऱ्या सुविधांमुळे आणि



कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे त्यांना थेट जिल्हा रुग्णालय, नंदुरबार येथे पाठवले जाते. धडगाव, मोलगी, अक्कलकुवा ते नंदुरबार जिल्हा रुग्णालय हे अंतर खूप जास्त असल्याने अनेकदा गंभीर रुग्णांना वेळेत उपचार मिळत नाहीत. यामुळे अनेक गर्भवती महिलांना, लहान मुलांना आणि सर्पदंश झालेल्या रुग्णांना वाटेतच जीव गमवावा लागतो. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही ही परिस्थिती कायम असल्याने आदिवासी समाजाच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) चे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी या गंभीर परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे तात्काळ लक्ष घालण्याची आणि आरोग्य विभागातील सर्व रिक्त पदे भरण्याची मागणी केली आहे. यावेळी युवक जिल्हा उपाध्यक्ष प्रणय पाटील आणि काँग्रेस पक्षाचे दत्तु पवार यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. आदिवासी समाज हा या देशाचा मूळ मालक असून, त्यांना उत्तम आरोग्य सेवा मिळणे हा त्यांचा हक्क आहे, असेही मोरे यांनी ठामपणे सांगितले. प्रशासनाने या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

संपादकीय

# विद्यार्थ्यांची प्रगती कशी होणार?



विद्यार्थ्यांची प्रगती होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेऊन अध्यापकांनी योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. मात्र काही ठिकाणी स्वत:ला अतिहुशार समजणारे अध्यापक तुला काहीच येत नाही असे सांगून विद्यार्थ्यांचे खच्चीकरण करत असतात. तेव्हा अध्यापकांनी विद्यार्थ्यांची प्रगती साधण्यासाठी विद्यार्थ्यांशी सकारात्मक संबंध निर्माण करून त्यांना प्रोत्साहित करायला हवे.देशाच्या विकासातील खरा केंद्र बिंदू हा विद्यार्थी असतो. तेव्हा चांगले विद्यार्थी घडविले पाहिजे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. तेव्हा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सुजाण नागरिकांची गरज असते. ते प्रामाणिकपणे घडविले गेले पाहिजे. हे घडविण्याचे महान कार्य अध्यापक करीत असतात. प्राथमिक शिक्षण असो किंवा उच्च शिक्षण असो अध्यापकांनी अभ्यासक्रम लक्षात घेऊन अध्ययन केले पाहिजे. दुर्दैवाने काही ठिकाणी आज तसे होताना दिसत नाही. प्राथमिक, माध्यमिक विभागातील प्रगती अतिशय उत्तम प्रकारची विद्यार्थ्यांची असून काही उच्च शिक्षणाचा विचार करता विद्यार्थी पास होण्यासाठी अतिशय जीवाची पराकाष्ठा करताना दिसत आहेत. तेव्हा अशी वेळ विद्यार्थ्यांवर का आली याचा सुद्धा विचार होणे गरजेचे आहे. यात अध्यापक कुठे कमी पडतात का किंवा विद्यार्थी मागे का राहतात याचा सुद्धा विचार होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला काहीच येत नाही असे सांगून मूळ विषयाला बगल दिली जाते. असे किती दिवस चालणार? यात शालेय किंवा महाविद्यालयीन व्यवस्थापन समितीची अतिशय महत्त्वाची जबाबदारी असते. ती जबाबदारी त्यांनी योग्य प्रकारे पार पाडली पाहिजे. बऱ्याच ठिकाणी समिती नावालाच असल्याची वर्तमानपत्रामध्ये वाचायला मिळते. जर समितीने आपले काम पारदर्शक केल्यास असा विषय लिहिण्याची वेळ येणार नाही. अध्यापन पदाची पात्रता असून आज कायमस्वरूपी अध्यापक लाखाच्या घरात पगार घेतात, तर कंत्राटी अध्यापकांना तुटपुंज्या पगारावर समाधान मानावे लागते. ही अध्यापकांची आर्थिक विषमता दूर होणे गरजेचे आहे. प्रत्येक अध्यापक पदवीधरांना पूर्ण वेतनी पगार मिळालाच पाहिजे. त्याच बरोबर अध्यापकांना शाळाबाह्य कामांपासून दूर ठेवावे.महत्त्वाची बाब म्हणजे, जी मुले शिष्यवृत्ती परीक्षा पास होऊन शिष्यवृत्ती मिळवतात तीच मुले उच्च शिक्षण घेताना पास होण्यासाठी धडपडताना दिसतात. तेव्हा विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा चिकित्सकपणे अभ्यास होणे गरजेचे आहे. मात्र फार कमी प्रमाणात आपल्या देशात प्रगती होताना दिसून येते. त्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवीत आहेत. सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षेत १४ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांच्या मार्फत फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल मे महिन्यामध्ये लागला. यात बारावीच्या एकाही विद्यार्थ्याला १०० टक्के गुण संपादन करता आले नाही मात्र दहावीच्या २११ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण संपादन केले आहेत. असे असताना उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती काही खालावल्यासारखी वाटते. उलट माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण देणाऱ्या अध्यापकांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला तर काही परिस्थिती गृहीत धरून याला जबाबदार कोण? याचे उत्तर आपणा सर्वांना शोधावे लागेल. कारण शेवटी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. वर्षभर अभ्यास करून विद्यार्थी उत्तीर्ण होत नसतील तर दोष कोणाला द्यायचा हा खरा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे पालकांनी एकत्र येऊन आपली मुले कुठे कमी पडतात? मुले अभ्यास करीत नाहीत का? किंवा कशाप्रकारे अध्यापक अध्ययन करतात याचा बारकाईने अभ्यास होणे आवश्यक आहे. आजची मुले ही उद्याची सुजाण नागरिक आहेत. हे विसरता कामा नये. असेच जर चालले तर अध्यापकांची सुद्धा परीक्षा होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या विषयाचे ज्ञान लक्षात येईल. म्हणजे यातूनच चांगले विद्यार्थी घडू शकतात. यासाठी अध्यापकांची मानसिक तयारी झाली पाहिजे.अध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करावे. त्यानंतर मूल्यांकनाचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात. यात अध्यापक तसेच विद्यार्थ्यांचा चांगला फायदा होतो. त्यासाठी अध्यापनामध्ये मूल्यांकनाला महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने नियमित मूल्यांकन होणे गरजेचे आहे. अध्यापकांनी सुद्धा आपल्या शैक्षणिक धोरणांचे मूल्यांकन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यामुळे विद्यार्थी सुद्धा जबाबदारीने शिक्षण घेऊन स्वत:ची प्रगती करू शकतात. त्यांना मूल्यांकनामुळे त्यांच्या हक्कांची जाणीव निर्माण होते. काही अध्यापक जाणूनबुजून विद्यार्थ्यांना त्रास देतात. याचा परिणाम विद्यार्थी टेन्शनमध्ये येतात. अशा अध्यापकांना सुद्धा धडा शिकविणे आवश्यक आहे. मात्र आपल्या मुलांना पुढे त्रास अध्यापक देतील म्हणून पालकवर्ग तक्रार करायला पुढे येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा शैक्षणिक संस्थेतील शिक्षण समितीने सतर्क राहणे गरजेचे आहे. तेव्हा अध्यापकांनी आपल्या विषयाच्या अभ्यासक्रमाची चांगली तयारी करावी. नि:पक्षपातीपणे अध्ययन करावे. तरच चांगले विद्यार्थी घडून देशाची प्रगती होण्याला मदत होईल. मात्र आजची परिस्थिती काहीशी वेगळी दिसते. त्यात बदल होणे गरजेचे आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते.

# शेतकरी आणि ग्राहक दोघेही हैराण: मिरचीच्या दरातील तफावतीमुळे व्यापारी मालामाल!

**बोरद । मंगेश पाटील**

महाराष्ट्रातील शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत, कारण त्यांना त्यांच्या शेतमालाला, विशेषतः हिरव्या मिरचीला, योग्य भाव मिळत नाहीये. दुसरीकडे, ग्राहक मात्र तीच मिरची चढ्या दराने खरेदी करत आहेत. या गंभीर परिस्थितीतून व्यापारी मात्र मोठा नफा कमवत असल्याचं चित्र समोर आलं आहे.सध्याच्या पावसामुळे मिरचीचे उत्पादन वाढले असले, तरी बाजारपेठेत आवक जास्त झाल्याने भाव मोठ्या प्रमाणात कोसळले आहेत. मिरची लागवडीसाठी एकरी सुमारे १ लाख रुपयांपर्यंत खर्च येतो, पण सध्या मिळणाऱ्या दरातून उत्पादन खर्चही निघत नाही. शेतकरी मिरची १२ ते १५ रुपये प्रति किलो दराने विकत आहेत, तर मिरची तोडणीचा खर्चच ६ ते ७ रुपये प्रति किलो इतका आहे. याशिवाय, मजुरांना रोजंदारी १५०० ते २००० रुपये द्यावी लागते, ज्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्येक किलोमागे ८ रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.शेतकऱ्यांकडून स्वस्त दरात खरेदी केलेली





मिरची किरकोळ बाजारात ग्राहकांना ३५ ते ४० रुपये प्रति किलोने मिळत आहे. शेतकरी आणि किरकोळ बाजारातील दरात मोठी तफावत असून, याचा फायदा व्यापारी वर्ग उचलत आहे. यामध्ये वाहतूक खर्च आणि व्यापाऱ्यांचा नफा गृहीत धरला जातो, पण तरीही ही तफावत खूप मोठी आहे.मिरचीच्या दरात घसरण होण्याची अनेक कारणे आहेत. पावसामुळे उत्पादन वाढले आणि बाजारात अचानक आवक वाढली. मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाल्याने दर खाली आले. याशिवाय, मिरचीचा मोठा आगार असलेल्या नंदुरबारमधून आखाती देश आणि बांगलादेशात निर्यात झालेली नाही. उत्तर भारतातूनही मागणी कमी असल्याने दरावर परिणाम झाला आहे. जास्त पावसामुळे मिरची लवकर खराब होते, त्यामुळे व्यापारी कमी दराने खरेदी करत आहेत, जेणेकरून त्यांचे नुकसान होणार नाही.

## शासनाने लक्ष घालण्याची गरज

शेतकरी आणि ग्राहक दोघांनाही फटका बसत असताना, फक्त व्यापारी वर्ग मालामाल होत आहे. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून, शासनाने यात लक्ष घालून शेतमालाच्या दरांमध्ये स्थिरता आणण्यासाठी योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळावा आणि ग्राहकांनाही वाजवी दरात शेतमाल उपलब्ध व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# हिंदी दिल की धडकन

# मातृभाषा दिल की आवाज

हिंदी भाषा ही देशाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे सर्वच प्रकारच्या शिक्षणामध्ये हिंदीला सक्तीची भाषा केलीच पाहिजे. देशात आनंदाची गोष्ट म्हणजे २०१४ पासुन हिंदी भाषेचा प्रसार भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणात होत आहे. युनो सारख्या मोठ्या मंचावर दीवंगत नेता अटल बिहारी वाजपेयी, सुष्मा स्वराज यांनी हिंदी भाषेत आपले विचार मांडुन देशाचा गौरव उंचावला आणि मोदी पंतप्रधान झाले तेव्हा पासुन संपूर्ण भारतात व जगात हिंदी भाषेचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे हि भारताच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची आणि कौतुकास्पद बाब आहे याचं मी मनापासून स्वागत करतो.भारताची राष्ट्रभाषा हिंदी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची जबाबदारी संपुर्ण भारतवासीयांची आहे. देशातील कोणताही व्यक्ती असो त्याला हिंदी भाषेचेज्ञान असायलाच पाहिजे. कारण हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून ओळखल्या जाते. हिंदी भाषा व प्रादेशिक भाषा या प्रत्येकाला येणे व समजने अती आवश्यक आहे. परंतु आताही भारतातील काही दीग्गज नेतागन व सिलेब्रेटी विदेशी दौऱ्यावर जातात तेव्हा इंग्रजी भाषेला खुपच महत्त्व देताना दिसतात हे योग्य नाही. परंतु पर्यायी भाषा म्हणून इंग्रजीचा वापर व्हावयास पाहिजे.भारतीय भाषा बऱ्याच आहेत त्या समृध्दीही आहेत. पण दक्षिणेतील भाषा समजायला कठीण जातात. हिंदी भाषा लवचिक असल्याने सर्वानाच लवकर समजते व अवगत होते. सर्वच धर्माच्या लोकांना हिंदी भाषेची जान आहे. फक्त दक्षिण भारतातील काही राजकीय पुढारी हिंदी भाषेचा विरोध करतांना दिसतात. ते विदेशी इंग्रजी भाषा बोलायला तयार आहेत. परंतु हिंदी भाषा बोलायला किंवा ऐकायला तयार नाहीत,हे कीतपत योग्य म्हणावे ? भारतात अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती आहेत. परंतु कोणीच आता पर्यंत हिंदीचा विरोध केलेला नाही. फक्त दक्षिणमध्येच हिंदीचा विरोध होतो.तामिळनाडुत करुणानिधी यांनी १९६५ मध्ये हिंदी भाषेचाकडाडून विरोध केला होता व त्यावेळेस राज्यात हिंदी विरूद्ध आंदोलन उभारण्यात करूनानिधींचा मोठा वाटा होता. या आंदोलनाला हिंसक वळणसुध्दा लागले होते. शेवटी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशात त्रिभाषा सूत्रसुरूच राहील असे स्पष्ट केले होते व आंदोलन थांबले. हिंदी भाषेचा त्रास ज्यांना आहे त्यांनी आपल्या प्रादेशिक भाषेचा वापर अवश्य करायला हवा. आपण सर्व हिंदुस्थानात रहातो मग सर्वानाच हिंदी भाषा का येऊ नये ?आपण संपूर्ण देशात इंग्रजीभाषा सक्तीची करू शकतो मग हिंदी का नाही? भाषावाद पहाता २०१४ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यानी निर्णय घेतला की केंद्र सरकारमधील सर्व अधिकृत सोशल मीडिया अकाउंट्सवर प्रामुख्याने हिंदीतून ट्विट करण्यात यावे आणि इंग्रजी ही ऐच्छिक भाषा असेल असे जाहीर केले होते. कारण सर्वानाच हिंदी भाषा अवगत आहे.भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासीत प्रदेश आहेत त्यात जर एकट्या तामिळनाडू सारख्या राज्याचा हिंदी भाषेला आताही विरोध असेल तर ते योग्य नाही. आपली मूळात इंग्रजी भाषा नाहीच मग इतका इंग्रजीचा उहापोह कशाला? देशाची राष्ट्रभाषा हिंदी आहे.मग सर्वच राज्यात हिंदी हा विषय अनिवार्य का नाही? मी सरकारला आवर्जुन सांगेल की, आपली मातृभाषा (प्रादेशिक भाषा). आपली राष्ट्रभाषा व नंतर इंग्रजी भाषा सर्वच राज्यांत सक्तीची करावी. जो राजकीय नेता राष्ट्रभाषेचा विरोध करेल त्याला दंडीत केलेच पाहिजे. कारण राष्ट्रभाषेचा विरोध करने म्हणजे राष्ट्राचा अपमान करने होय असे मी समजतो. तामिळनाडुमधील अनेक लोक इतर राज्यात नौकरी किंवा व्यवसाय करीत आहेत त्यांना हिंदीची जान आहे मग तामिळनाडूच्या नेत्यांना हिंदीचा विरोध का? संपूर्ण देशाने हिंदी भाषेची जोपासना करावी त्याच सोबत संपूर्ण राजकीय पक्षांनी हिंदी भाषेचा वापर सर्वात जास्त करावा. संपूर्ण सरकारी कामे प्रादेशिक भाषेत किंवा हिंदी तुमचं व्हावयास पाहिजे. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी प्रधानमंत्री होताच करुणानिधी, जयललिता, वायको, उमर अब्दुल्ला यांनी हिंदी भाषेला विरोध केला होता. त्याचबरोबर २०१४ मध्ये जम्मु काश्मिरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला म्हणाले होते की, भारतासारखा खंडप्राय देशात अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात या देशातील धार्मिक आणि भाषिक संस्कृती वेगवेगळ्या प्रकारची आहे अशा परीस्थितीत हिंदीचा अट्टाहास धरता येणार नाही असे त्यांनी त्यावेळेस म्हटले होते.भारतात अधिकृत २२ भाषा असल्या तरी भारतात ५०० हुन अधिक महत्वपूर्ण भाषा आहेत. मग हिंदीला राष्ट्र भाषेचा दर्जा दीलेला आहे त्याचे काय ? आपण स्वातंत्र्यात जगत आहोत त्यामुळे इंग्रजीचा जास्त लाड करने योग्य नाही.आजही प्रत्येक देशाला आपआपल्या राष्ट्रीय भाषेचा अभिमान आहे.त्याचप्रमाणे आपल्याला सुध्दा राष्ट्रभाषेचा अभिमान असायला हवा.परंतु आजही भारतात इंग्रजीला अधिक जवळ करतात हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.ही बाब सत्य आहे की, २०१४पासुन संपूर्ण भारत हिंदी भाषामय झालेला आहे यात तिळमात्र शंका नाही. २०१४ पासून आजपर्यंत संपूर्ण जगभर हिंदीचा प्रसार सुध्दा होत आहे ही भारताकरीता स्वाभिमानाची आणि गौरवास्पद बाब आहे. परंतु आताही भारतात काही हिंदी विरोधी आहेत त्यांना हिंदीचा पाठपढविने अत्यंत गरजेच आहे. देशात असेही प्रधानमंत्री होवुन गेले की त्यांनी हिंदीचा वापर नाहीच्या बरोबरीने केलेला आहे.त्याचप्रमाणे आताही अनेक सांसद हिंदी किंवा मातृभाषेचा वापर न करता संसदेत आपले विचार इंग्रजीत मांडतात.याकडे सुध्दा लक्ष वेधले पाहिजे. मनुष्य प्राणी हा बुध्दीजीवी आहे. त्याला सर्वच गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे जगात प्रत्येक देशाच्या वेगवेगळ्या भाषा आहेत. त्याही शिकायला हरकत नाही यांनी ज्ञान वाढते. परंतु मातृभाष आणि राष्ट्रभाषेला विसरता कामा नये ही बाब सर्वानीच लक्षात ठेवले पाहिजे. माझ्या माहीतीनुसार जगात इतक्या भाषा नसतील तीतक्या भाषा भारतात आहे त्या शिकाव्यात. परंतु मातृभाषेचा व राष्ट्रभाषेचा विसर पडणार नाही याचीही काळजी व जबाबदारी सर्वांनीच घ्यावी.जगात भारत असा देश आहे की या ठिकाणी देव–दानव, साधु–संत, थोर महात्मे, थोर पुरुष, राजे–महाराजे, क्रांतीकारी,थोरविचारवंत इत्यादींच्या मंथनातून हा देश घडलेला आहे. त्यामुळे जगातील प्रत्येक देशाच्या व्यक्तीला भारतीय संस्कृती भारावते आणि त्याचा आनंद सुध्दा घेतात. त्यामुळेच आपल्या पुर्वजांनी हिंदी भाषा सरळ,सोपी व लवचिक बनवीली जेनेकरून ती सर्वान समजायला सोपी जाईल. हिंदी या शब्दात बरंच काही लपलेलं आहे.हिंदी पासुन हिंदुस्थानात, हिंदव स्वराज्य, जय हिंद, आझाद हिंद सेना असे अनेक महत्त्वपूर्ण उर्जा देणारे आणि क्रांतिकारी शब्दाशी हिंदीशी निगडित असुन जवळचे नाते आहे. ते सर्वानीच जपले पाहिजे, भारताला हिंदी व मातृभाषा ही आपल्या पुर्वजांनी दिलेली संजीवनी आहे.कारण यातुनच देवान–घेवान व संस्कृतीचे जतन होत असते.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**

# नव्या दोस्तीची अमेरिकेला धास्ती

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ नीतीमुळे चीन, भारत, रशिया अमेरिकेची व्यूहनीती झुगारून एकत्र आले. अमेरिकन तज्ज्ञांकडून तसेच परराष्ट्र व्यवहारातील जाणकारांकडून त्याबाबत ट्रम्प यांना इशारे दिले जात होते. शांघाय सहकार्य परिषदेनंतर त्याची जाणीव व्हायला लागल्यामुळे ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. हे तीन देश एकत्र येण्याची अमेरिकेला धास्ती का आहे, याचा हा लेखाजोखा.चीनने गेल्या आठवड्यात आपल्या शक्तीचं प्रदर्शन केले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीला ८० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित लष्करी परेडमध्ये हे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. हजारो किलोमीटर अंतरावर वॉशिंग्टन डीसीमध्ये उपस्थित असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पदेखील यावर लक्ष ठेवून होते. ते म्हणाले, की मी ते पाहावे अशी त्यांची इच्छा होती आणि मी ते खरोखर पाहत होतो. तियानमेन चौकात झालेल्या या भव्य समारंभाबद्दल अमेरिकन अध्यक्षांनी तपशीलवार काहीही सांगितले नाही; परंतु त्यांनी 'खूप, खूप प्रभावी' असे वर्णन केले. दुसरीकडे, ट्रम्प आणि उर्वरित जगासाठी चीनचा संदेश अगदी स्पष्ट होता. तो संदेश असा होता की, जगात एक नवीन शक्ती केंद्र तयार होत आहे. ते शंभर वर्षे जुन्या अमेरिकन वर्चस्व व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी सज्ज आहे. ही लष्करी परेड आयोजित केली जात होती, त्या दिवशी ट्रम्प ओव्हल ऑफिसमध्ये पोलंडच्या राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरात्स्की यांना भेटत होते. त्या वेळी ते चीनच्या या लष्करी परेडबद्दल जास्त काही बोलले नाही. चीनसोबतच्या 'टॅरिफ वॉर' दरम्यान घडलेल्या घटनांबद्दल ट्रम्प यांच्या विधानांमध्ये उदासीनता, तक्रार आणि चिंता यांचे मिश्रण स्पष्टपणे दिसून येत होते. परेडबद्दल ट्रम्प निष्काळजी दिसले. त्यांनी सांगितले, की दोन डझनहून अधिक राष्ट्रप्रमुखांसमोर चीन करत असलेल्या शक्तिप्रदर्शनाची चिंता नाही. तथापि, चीन दुसऱ्या महायुद्धातील योगदानाचे श्रेय अमेरिकेला देत नाही, याबद्दल त्यांनी तक्रार केली. तुम्ही अमेरिकेविरुद्ध कट रचत असताना कृपया पुतीन आणि किम जोंग उन यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा कळवा, असे ते उपहासाने म्हणाले. एकंदरीत, इतर राष्ट्रांचे एकत्र येणे ट्रम्प यांना अस्वस्थ करत आहे.ट्रम्प यांना परेड आणि लष्करी शक्तीच्या प्रात्यक्षिकांबद्दल विशेष प्रेम आहे. गेल्या महिन्यात त्यांनी अलास्कामध्ये पुतीन यांचे लाल कार्पेटवर स्वागत केले. त्यांच्या डोक्यावरून स्टेल्थ बॉम्बर आणि अमेरिकन जेट उडत होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी अमेरिकन सैन्याच्या २५०व्या वर्धापन दिनानिमित्त वॉशिंग्टनमध्ये लष्करी परेडचे आयोजन केले होते. चीनची नवीनतम लष्करी परेड उच्च तंत्रज्ञानाची शस्त्रे आणि शिस्तबद्ध मार्चिंगसाठी ओळखली गेली. त्या तुलनेत अमेरिकेच्या लष्करी इतिहासाची आठवण करून देणारी अमेरिकन परेड ही एक सामान्य घटना होती. तिथे दुसऱ्या महायुद्धात वापरले जाणारे टँक आणि क्रांतिकारी काळातील सैनिक व्हाईट हाऊसजवळील कॉन्स्टिट्यूशन अव्हेन्यूवर आरामात फिरताना दिसले. ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या घोषणेवर आधारित ही एक प्रकारची आठवणींना उजाळा देणारी घटना होती. अमेरिकेच्या गौरवशाली इतिहासाकडे मागे वळून पाहताना आणि या कार्यक्रमाद्वारे ट्रम्प १९व्या शतकातील त्या काळाची आठवण करताना दिसले. त्याला ते 'अमेरिकन इतिहासातील सर्वात महान युग' म्हणतात.चीनच्या लष्करी परेडमध्ये त्याची भविष्यातील शस्त्रे प्रदर्शित करण्यात आली आणि तेथील कम्युनिस्ट सरकारने हेदेखील दाखवण्याचा प्रयत्न केला की दुसऱ्या महायुद्धात फॅसिझम आणि साम्राज्यवादाला पराभूत करण्यात चीनने मोठी भूमिका बजावली. त्या युद्धाने तथाकथित 'अमेरिकन शतका'ची सुरुवात केली असेल, तर चीन आता नवी जागतिक व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी होईल, असा त्यांचा दावा आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात त्यांचे सहाय्यक असलेले रिचर्ड विल्की म्हणाले की दुसऱ्या महायुद्धात जपानच्या पराभवात चिनी राष्ट्रवादी आणि अमेरिकन सैन्याचे योगदान चिनी कम्युनिस्ट सैन्याच्या योगदानापेक्षा जास्त होते. तथापि, या आठवड्यात चीनची लष्करी परेड हे अमेरिकेला चिंता करण्याचे एकमेव कारण नव्हते. याशिवाय अमेरिकन धोरणकर्त्यांना चिंता वाटावी, अशी आणखी बरीच कारणे होती. तियानजिनमधील शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दरम्यान, चीन आणि भारतातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे एक मोठे कारण म्हणजे ट्रम्प यांनी भारतावर लादलेले शुल्क. त्याचा भारत आणि अमेरिकेतील मैत्रीवर विपरीत परिणाम झाला आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे जगाचे आर्थिक आणि राजकीय ध्रुवीकरण बिघडले आहे. प्रतिस्पर्धी मानले जाणारे चीन, रशिया आणि भारत हे देश बदललेल्या परिस्थितीत एकत्र कसे येऊ शकतात याचे एक उत्तम उदाहरण आहे.ट्रम्प यांनी अमेरिकन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी आणि सरकारसाठी नवीन महसूल उभारण्यासाठीच्या योजनेचा एक भाग म्हणून शुल्कांचे समर्थन केले आहे. ट्रम्प समर्थित 'अमेरिका फर्स्ट फॉरेन पॉलिसी इन्स्टिट्यूट'मधील अमेरिकन सिक्युरिटीचे सह–अध्यक्ष रिचर्ड विल्की म्हणतात, कोरियन, जपानी, फिलिपिन्स आणि व्हिएतनामी लोकांना हे चांगलेच ठाऊक आहे की खरा धोका त्यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापार भागीदारीतील किरकोळ अडथळे नसून चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा आहे. ट्रम्प अनेकदा इतर देशांमधील संघर्ष आणि चिंतांबद्दल उदासीन राहिले आहेत. त्याबाबत मदत करत नाही. त्याऐवजी ते ग्रीनलँड, पनामा आणि कॅनडासारख्या भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ असलेल्या देशांमधील समस्यांबद्दल उत्सुकता दाखवत आहेत. विजय दिनाच्या परेडमध्ये चीनने जगाला आपले लष्करी सामर्थ्य दाखवले. त्यातून लक्षात आले की, ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांमुळे अमेरिकेचा विजय होण्याऐवजी अपयश येण्याचा धोका आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या अमेरिका केंद्रित व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून लादलेले शुल्क अमेरिकन न्यायालये रद्द करू शकतात. नव्हे, तशी चिन्हे वाढत आहेत. गेल्या आठवड्यात एका अपील न्यायालयाने निर्णय दिला, की ट्रम्प यांचे बरेच शुल्क संघीय कायद्याच्या चुकीचा अर्थ लावण्यावर आधारित होते; पण ट्रम्प यांनी या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयात ट्रम्प यांचे समर्थक मानले जाणारे रूढीवादी न्यायाधीशांचे वर्चस्व असले, तरी काँग्रेसच्या परवानगीशिवाय प्रमुख धोरणे अमलात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रपतींविरुद्ध त्यांनी खूप कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या शुल्कांवर ते सौम्य भूमिका घेतील, अशी शक्यता कमी आहे. व्यापाराच्या बाबतीत ट्रम्प नेहमीच त्यांच्या मनाचे ऐकत आले आहेत. त्यांनी अनेक पारंपरिक धोरणे बदलली असून नवीन व्यापारी भागीदार बनवले आहे. ट्रम्प यांनी दावा केला आहे, की त्यांचे व्यापार धोरण अमेरिकेला 'दुसऱ्या सुवर्णयुगाकडे' घेऊन जाईल; पण तियानमेन चौकातील चिनी लष्करी परेड असो किंवा अमेरिकन न्यायालये; ट्रम्प यांच्या शुल्कामुळे निर्माण झालेला धोका काल्पनिक नाही, तर वास्तविक आहे. भारताच्या वृत्तीबद्दल ट्रम्प यांची चिडचिड वाढत असल्याचे दिसून आले. एकीकडे भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकला नाही, तर दुसरीकडे अमेरिका आपल्या देशातच अनेक समस्यांनी वेढली गेली आहे. असे असूनही, ट्रम्प यांची हेकेखोरी कायम होती; परंतु आता त्यांना वास्तवाची जाणीव झाली असावी.

# समाजाच्या शेवटच्या घटकाच्या विकासासाठी प्रसारमाध्यमांची साथ आवश्यक-संजय शिरसाट

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने पत्रकारांना सन्मानित करण्याचा निर्णय लवकरच

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभाग हा समाजातील तळागाळातील घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेला शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाने हाती घेतलेल्या समाज हिताच्या विविध योजना आणि उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमांची साथ अत्यावश्यक असल्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. समाज कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोनदिवसीय बैठकीचे उद्घाटन आज पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे होते. यावेळी आमदार प्रशांत बंब, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती व जनसंपर्क संचालक (वृत्त - जनसंपर्क) तथा समितीचे सदस्य सचिव किशोर गांगुर्डे, राज्य समितीचे सदस्य आणि विभागीय माहिती उपसंचालक उपस्थित होते.लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. चांगले काम जनतेपर्यंत पोहोचवणे आणि चुकीच्या गोष्टींना आरसा दाखवणे, हे काम प्रसारमाध्यमे करतात. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. या विभागामार्फत राज्यात नवीन १२० वसतिगृहे उभारण्याचे प्रयत्न सुरू असून, आतापर्यंत ४८ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. समाजातील विषमतेची दरी कमी करून सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, यासाठी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसोबत एकत्रित प्रवेश देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होईल, असा उद्देश असल्याचे पालकमंत्री श्री. शिरसाट यांनी सांगितले.सामाजिक न्याय विभागामार्फत समाजकल्याणासाठी सकारात्मक बदल घडविण्यासाठी पावले उचलली जात आहेत. योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि वंचित घटकांच्या विकासाला गती देण्यासाठी प्रसारमाध्यमांनी सकारात्मक साथ द्यावी, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले. समाज कल्याण क्षेत्रात, विशेषतः अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. यापुढे या क्षेत्रात काम करणाऱ्या



पत्रकारांनाही या पुरस्काराने गौरवण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.
लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ अशी प्रसारमाध्यमांची ओळख आहे. आजही समाजाला दिशा देण्याचे आणि शासनाच्या योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रसारमाध्यमे करतात. योजनांबाबत जनतेच्या प्रतिक्रिया मांडणे आणि आवश्यक बदल सुचवणे यातही प्रसारमाध्यमांची भूमिका मोलाची आहे. त्यामुळे शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली.सामाजिक न्याय आणि इतर मागास बहुजन कल्याण विभाग समाजातील मोठ्या घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. शासनाच्या प्रतिमानिर्मितीत या विभागांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे या विभागांच्या योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी विभागीय स्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करून त्यात पत्रकारांचा सहभाग घेतल्यास योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, असे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी सांगितले. तसेच, अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.प्रसारमाध्यमांमुळे लोकशाही बळकट झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञानाचे चांगले बदल तसेच काही दुष्परिणामही दिसत आहेत. याबाबत प्रसारमाध्यमांनी समाजाला मार्गदर्शन करून येणाऱ्या आव्हानांची जाणीव करून द्यावी, असे मत आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केले.प्रसारमाध्यमांमुळे प्रशासकीय कामकाजात सकारात्मक बदल घडतात, असे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी नमूद केले. तसेच, हुंडाबळी, बालविवाह, गर्भलिंग निदान आणि स्त्री-भ्रूण हत्या यासारख्या चुकीच्या प्रथांना आळा घालण्यासाठी प्रसारमाध्यमांनी पुढाकार घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.प्रारंभी माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकात बैठकीच्या आयोजनाची भूमिका विशद केली आणि पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ. माधव सावरगावे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी केले.

# शाहिरी लोककला संमेलन सांगली येथे सागर भिसे यांचा सन्मान करण्यात आला

**बारामती । प्रतिनिधी**

१९९१ साली सागर भिसे, एक सामान्य उद्योजक, यांनी इंदापूर तालुक्यामध्ये आपलं करियर सुरू केलं. आज, ३० वर्षांनी, ते एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात.
समाजाबद्दलची त्यांची तळमळ केवळ व्यवसायापुरती मर्यादित नाही. समाजातील गरजूंना मदत करण्याची त्यांची इच्छा नेहमीच दिसून येते. त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोककवी वामनदादा कर्डक यांच्या विचारांना पुढे नेण्याचं काम करत आहेत.
अण्णाभाऊ साठे आणि वामनदादा कर्डक यांनी आपल्या शाहिरी आणि कवितांच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण केली. त्यांचे विचार आणि शाहिरी आजही समाजाला प्रेरणा देतात. सागर भिसे यांनी या महान व्यक्तींच्या कार्याचा सन्मान स्वीकारण्यासाठी पुढाकार घेतला, ही एक मोठी गोष्ट आहे.



त्यांनी शाहिरी लोककला संमेलन सांगली येथे उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद घेतला
आज जेव्हा शाहिरी लोककला संमेलनात त्यांचा सन्मान करण्यात आला, तेव्हा त्यांना त्यांच्या कार्याबद्दल लोकांनी दिलेली ही एक मोठी पावती होती. समाजात असे लोक आहेत, जे केवळ स्वतःचा व्यवसाय वाढवत नाहीत, तर समाजाच्या विकासासाठी आणि संस्कृतीच्या जतनासाठीही योगदान देतात.
अशा महान व्यक्तींना सन्मानित करताना, आपल्याला एक गोष्ट समजून येते. कोणत्याही व्यक्तीचा सन्मान हा केवळ त्याच्या संपत्तीवर नाही, तर त्याच्या चांगल्या कार्यावर अवलंबून असतो.
/लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोककवी वामनदादा कर्डक यांच्या संयुक्त जयंती निमित्त
शाहीर लोककला संमेलनामध्ये सन्मानित उद्योजक सागर भिसे साहेब यांच अभिनंदन आणि शुभेच्छा.
समाजातल्या सर्व स्तरातील लोकांसाठी, त्यांच्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी, आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांना पुन्हा एकदा जागृत करण्याचं काम केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

# पत्रकारास शिवीगाळ व मारहाण प्रकरणी शिष्टमंडळाची पोलीस अधीक्षकांकडे धाव

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरातील पत्रकार शब्बीर सय्यद यांना कोतवाली पोलीस स्टेशनचे डीबी इंचार्ज पोलीस अधिकारी गणेश देशमुख यांनी शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याच्या घटनेने पत्रकार वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाचा निषेध नोंदवून पत्रकारांच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.
निवेदनात म्हटले आहे की, शब्बीर सय्यद हे रात्री घरी जात असताना कोतवाली पोलिसांची गाडी अतिवेगाने पोलीस ठाण्यात शिरली. काही गंभीर घटना घडली असावी असा संशय आल्याने सय्यद यांनी चौकशी केली. त्यावर अधिकारी गणेश देशमुख यांनी आक्रमक होत तू मला विचारणारा कोण? असे अपमानास्पद शब्द उच्चारले. पत्रकार असल्याचे सांगितल्यावर त्यांनी सय्यद यांना शिवीगाळ केली, कॉलर पकडून ठाणे अंमलदारासमोर मारहाण केली तसेच





अपमानास्पद वागणूक दिली.
सय्यद यांनी विरोध केल्यावर देशमुख यांनी पुन्हा शिवीगाळ केली, ओळखपत्र मागवूनही नाकारले, मोबाईल हिसकावून घेतला व ३५३ कलमाखाली गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. मोबाईल व ओळखपत्र परत करतानाही अपमानास्पद शब्दांत धमकावत परत दिसल्यास गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचे सय्यद यांनी सांगितले.
या घटनेचा निषेध व्यक्त करत पत्रकार शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन दिले. यावेळी पत्रकार विठ्ठल लांडगे, सुभाष चिदे, साहेबराव कोकणे, शब्बीर सय्यद, अण्णासाहेब नवथर, सूर्यकांत नेटके, आफताब शेख, बाबा ढाकणे, अझर सय्यद, मुंतजीर शेख आदी उपस्थित होते.
पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आश्वासन दिले आहे की लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल.

# पंतप्रधान मोदींकडून देशभक्तीचा व्यापार ठाकरेंचा भारत-पाक सामन्यावर संताप

## उद्या मोदींना राज्यातील 'हर घरसे सिंदूर' पाठवणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी भारत-पाक क्रिकेट सामन्यावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर तिखट हल्ला चढवला. पहलगाम हल्ल्यात बळी गेलेल्या भारतीयांचे रक्त अजून सुकले नाही. त्यांचे घाव भरले नाहीत. पण त्यानंतरही केंद्र सरकार पाकशी क्रिकेट खेळून देशभक्तीचा व्यापार करत आहे, असे ते म्हणालेत.
उद्धव ठाकरे शनिवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आज एका उद्विग्न भावनेतून व विषन्न मनाने मी तुमच्याशी बोलत आहे. उद्या अबूधाबीत भारत-पाक क्रिकेट सामना आहे. अजूनही पहलगाम हल्ल्यात बळी गेलेल्या भारतीयांचे रक्त सुकले नाहीत. त्यांचे घाव भरले नाहीत. त्यानंतर भारतीयांना वाटले होते की, आपण आता पाकला जागेवर



ठेवणार नाही. त्याचे दोन-तीन तुकडे करून टाकू. त्या दृष्टीने एक चढाई व युद्धही केले गेले. त्याला ऑपरेशन सिंदूर असे नाव ठेवण्यात आले. मधल्या काळात आपल्या संरक्षणमंत्र्यांनी हे ऑपरेशन अजूनही सुरू असल्याचे सांगितले. एकूणच ते जे काही वातावरण होते, ते आपल्यासाठी नव्हते. कारण, काही दिवसांनी किंवा वर्षांनी पाक आपल्या देशात अतिरेकी हल्ले करतो. त्यावेळी आपण सर्वजण जागे होतो. सरकारही चवताळून उठतो.आपले सैनिक दरवेळी शौर्य गाजवतात. यावेळी तर आपण पाक पादाक्रांत करत असल्याचे चित्र होते. आपल्या सैनिकांनी शौर्याची पराकाष्ठा केली होती. पण अचानक अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध थांबवल्याची घोषणा केली. व्यापारासाठी युद्ध थांबवल्याचे ते म्हणाले. त्याच सुमारास भालाफेकीत भारताचे नाव उज्वल करणाऱ्या नीरज चोप्राने एका पाकिस्तानी प्रशिक्षकाला भारत भेटीचे निमंत्रण दिले होते. तो प्रशिक्षक आला नाही. पण त्या नीरज चोप्रावर अंधभक्तांनी देशद्रोही असल्याची टीका केली होती. त्यावेळी त्याच्यावर काय बेतले असेल त्याची मला कल्पनाही करवत नाही.पण आता आपण ज्या पाकबरोबर युद्ध पुकारले होते, त्याच पाकशी उद्या क्रिकेट खेळणार आहोत. आज असे अचानक काय झाले? ऑपरेशन सिंदूरनंतर जगभरात मोदींनी सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवले होते. त्यातून भारताची लढाई पाक पुरस्कृत दहशतवादाशी असल्याचा संदेश दिला होता. आता त्यांना नेमके काय झाले? ही देशभक्तीची थट्टा आहे. थट्टाच नव्हे तर देशभक्तीचा हा व्यापार आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# स्वारगेट मेट्रो स्टेशनची मंत्री पाटलांकडून पाहणी

**पुणे (वृत्तसंस्था)**-आगामी काळात स्वारगेट मेट्रो स्थानक हे सर्वसामान्य पुणेकरांना प्रवाशांना प्रवासासोबतच; कॉर्पोरेटसाठी मल्टीमॉडेल हब देखील ठरेल, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी व्यक्त केला. पाटील यांनी स्वारगेट मेट्रो स्थानकास भेट देऊन; स्थानकाच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला.यावेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, संचालक अतुल गाडगीळ, संचलन व प्रणालीचे संचालक विनोदकुमार अग्रवाल यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.
चंद्रकांत पाटील म्हणाले की, स्वारगेट बस स्थानक हे पुण्यातील सर्वात व्यस्त बस स्थानक आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून असंख्य नागरिक पुण्यात येण्यासाठी स्वारगेट बसस्थानकाचाच वापर करतात. यापूर्वी स्वारगेटला आलेला प्रवाशाला आपल्या इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी पीएमपीएमएल किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. मात्र, पुण्याच्या उदरात तयार झालेले मेट्रो स्टेशनला आताच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.ते पुढे म्हणाले की, स्वारगेट मेट्रो स्थानकाचा आराखडा अतिशय भव्य स्वरूपाचा



आहे. हे स्टेशन एका मोठ्या मल्टीमोडल हबमध्ये विकसित केले जात आहे, ज्यामुळे विविध वाहतूक सेवांचे एकत्रीकरण होणार आहे. त्यामुळे आगामी काळात कॉर्पोरेटसाठी देखील प्रमुख आकर्षणाचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# वैजापूर तालुक्यात कायदेविषयक माहिती देण्यासाठी फिरते लोक अदालत आयोजित

**वैजापूर । प्रतिनिधी**

कायदेविषयक माहिती देण्यासाठी आणि लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी फिरते लोक अदालत आयोजित करण्यात आली. तालुक्यातील जाबरगाव, चिंचडगाव आणि चोरवाघलगाव येथील ग्रामसभेत ही लोक अदालत विधी सेवा समिती तसेच जिल्हा वकील संघ, वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ११) आयोजित करण्यात आली.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश व विधी सेवा समिती अध्यक्ष श्रीमती एस. के. उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली व दिवाणी व फौजदारी न्यायाधीश एन.एस. काळे यांच्या अध्यक्षतेखाली ही लोक अदालत घेण्यात आली. फिरते लोक अदालत व्हॅनचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश व विधी सेवा समिती अध्यक्ष श्रीमती एस. के. उपाध्याय यांनी केले. यावेळी तदर्थ जिल्हा न्यायाधीश एल.जी. पाच्छे, दिवाणी न्यायाधीश ए. बी. शेख, न्यायाधीश डी.एस. पिसाळ, न्यायाधीश एस. के. खान, न्यायाधीश एम.एस. बेंद्रे, तसेच वकील संघाचे अध्यक्ष अँड महेश कदम उपस्थित होते.व्हॅनच्या माध्यमातून न्यायाधीश एन.एस. काळे यांनी लोकांना लोक अदालत काय आहे, ती कशी कार्य करते आणि नागरिकांना जलद व खर्च वाचवून न्याय मिळवण्याची प्रक्रिया कशी आहे, याची माहिती दिली. तसेच वकील संघाचे ज्येष्ठ सदस्य अँड सोपान पवार यांनी मोटार वाहन कायद्यातील तरतुदी व दंड रक्कमेबाबत माहिती दिली, तसेच ई-चलनाद्वारे दंड भरल्यास दंड कमी होण्याची सोय दर्शविली. अँड ज्ञानेश्वर डगळे यांनी महिला संरक्षण कायदा व वृद्ध व्यक्तींवरील कायद्यांची माहिती दिली.याशिवाय अँड नवनाथ गायकवाड, अँड अशोक सोनवणे, अँड ज्ञानेश्वर वरपे, अँड बाबासाहेब अढांगळे यांनी नागरिकांचे हक्क व अधिकार याविषयी मार्गदर्शन केले. अँड शुभम शिंदे, अँड शुभम ठोंबरे, हेड कॉन्स्टेबल किसन गवळी, मनोज कुलकर्णी, न्यायालयीन कर्मचारी अनिल साळवे, विजय सोनवणे व स्वच्छता कर्मचारी हुसेन भाई यांनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला.वकील संघाचे अध्यक्ष अँड महेश कदम यांनी कार्यक्रमाची प्रास्ताविक भूमिका सादर केली. या फिरते लोक अदालत कार्यक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते आणि त्यांनी कायदेशीर माहिती मिळवून न्याय प्रक्रियेबाबत मार्गदर्शन घेतले.

# पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर

## अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया अधिवेशनात डॉ.भागवत कराड



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पत्रकार हे वर्षानुवर्ष समाजासाठी काम करतात. त्यांच्या समस्या मी नेहमीच गांभीर्याने घेत असतो. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्यविषयक व रेल्वेविषयक समस्या सोडविण्यासाठी मी कसोशीने प्रयत्न करीन, असा विश्वास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केला.अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात डॉ.भागवत कराड बोलत होते.अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते.यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मंजूरभाई शेख, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो.पी.लांडगे, लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेटे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिप अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी डॉ.भागवत कराड यांनी पत्रकारांच्या विविध समस्यांविषयी सोडवणूक करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व छोट्या-मोठ्या व्यवसायाला बळकटी देण्यासाठी मुद्रा लोन विषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख वक्ते तुळशीदास भोईटे व रवींद्र पोखरकर यांनी मार्गदर्शन केले.ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे यांनी ए.आय. आणि मराठी पत्रकारिता, या विषयावर तर डॉ.अनिल फळे यांनी डिजिटल मीडिया : श्वास महाराष्ट्राचा, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक,कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर यांनी केले.अध्यक्षीय समारोपात एस.एम.देशमुख यांनी डिजिटल मीडियाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली. सरकार अद्यापही यु ट्युबच्या पत्रकारांना पत्रकार मानायला तयार नाही. पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य सरकार चालढकल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पत्रकार संरक्षण कायदा मंजूर होऊन सात वर्षे झाली. तरी सरकार अद्यापही अधिसूचना काढायला तयार नाही. पत्रकारांच्या पेन्शनचे, अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचे प्रश्न प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले.अधिवेशनाचे प्रास्ताविक बालाजी सूर्यवंशी यांनी तर आभार प्रकाश भगनुरे यांनी मानले. या अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार राम अग्रवाल, नागेश गजभिये, स.सो.खंडाळकर, डॉ,धनंजय लांबे, डॉ. मोहम्मद अब्दुल कदीर, जगन्नाथ सुपेकर, रमेश खोत, यांचा पत्रकारितेतील दीर्घ सेवेबद्दल सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या अधिवेशनासाठी राज्यभरातील मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया, यु ट्युब चॅनेल व पोर्टलच्या पत्रकार व संपादकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# उपप्राचार्य पदी नियुक्ती बद्दल प्रा.डॉ.अनिता शिंदे यांचा सत्कार संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

फुले,शाहू, आंबेडकर यांच्या विचारानुसार व बहुजन हिताय बहुजन सुखाय हा मुल मंत्र जपून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या आदरणीय स्वर्गवासी केशर काकूंच्या के.एस.के कॉलेज वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी संस्थेच्या वतीने मला दिलेल्या उपप्राचार्य पदाच्या जबाबदारीला तडा न जाऊ देता के.एस.के कॉलेजचा यशाचा जो आलेख उंचावलेला. आहे त्यात वरिष्ठांच्या सहाय्याने अधिक कसा उंचावेल असा प्रयत्न माझ्याकडून केला जाईल असे सद्गतीत होऊन भावोद्गार प्रा.डॉ.अनिता शिंदे यांनी नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड .बीड येथे विहार कमिटीतर्फे केलेल्या सत्कार प्रसंगी काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी आयु. केशरताई कांबळे लाभल्या होत्या तर पाहुणे छाया धनवे, सुनिता शिंदे त्याची उपस्थिती होती. पावणे व प्रमुख पाहुणे व सत्कार मूर्ती यांच्या हस्ते आदर्शांना पुष्प, पुष्प माला अर्पण करून दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास सेनि सहाय्यक निबंधक (सहकार) हनुमंत कांबळे, प्रा.विठ्ठलराव गाडे, प्रा. टी.जी.कांबळे, श्रीरंग डोळस, महामानव अभिवादन ग्रुपचे काशिनाथ वाघमारे, डी.एन.पोटभरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एल.आय.सी. यु.एस वाघमारे यांनी केले तर प्रस्ताविक अँड.डी.एम .विद्यागर यांनी करून नागसेन बुद्ध विहार धम्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा राबवीत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाप्रसंगी प्रा.डॉ.अनिता शिंदे सोबत सहकार्य म्हणून कार्य केलेले सेनि प्रा.विठ्ठल गाडे यांनी शिंदे यांच्या संदर्भात शैक्षणिक, सामाजिक व कॉलेजच्या उत्कर्षाकरिता वरिष्ठांच्या साह्याने करीत असलेल्या कामाबद्दल गौरव उद्गार काढले. व पुढील कार्यास मनोमय मंगल कामना व्यक्त केल्या. याप्रसंगी उपस्थित असलेले वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे अध्यक्ष डि.जी.वानखेडे, यांनी शुभेच्छा देते प्रसंगी सांगितले की जो पर्यंत फुले,शाहू, आंबेडकर यांच्या मानवाच्या कल्याणाच्या मार्गानुसार प्रा.डॉ.अनिता शिंदे जीवन घालवत आहेत तोपर्यंत त्यांच्या प्रगतीची वाट सुखकर होणार आहे. तथागताने सांगितल्या प्रमाणे त्यांना कुशल कर्माचे फळ त्यांना नक्कीच मिळाले व उपप्राचार्य पदाच्या जबाबदारीमध्ये वाढ झालेली आहे. त्या सर्व जबाबदाऱ्या पूर्णपणे यशस्वीरित्या पार करण्याकरिता, पुढील प्रगती करता मनोमय मंगल कामना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास सुंदरराव तांगडे, विनोदकुमार अवसरमल, टी.बी.उजगरे, अच्युतराव उजगरे, सुनीलराव कांबळे,व परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिकांची व बालक बालिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार ए.पी.सोनवणे यांनी व्यक्त करून सरणात्यन कार्यक्रमाची सांगता झाली.

# नंदुरबारच्या आरोग्य सेवेला मिळणार 'टास्क फोर्स'ची संजीवनी; कुपोषण, सिकलसेलवर होणार परिणामकारक उपाय



**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या आरोग्य सेवेत क्रांती घडवण्यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी टास्क फोर्सची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. या टास्क फोर्सचे नेतृत्व जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी करणार आहेत. जिल्ह्याच्या दुर्गम भागातील आरोग्य समस्या, कुपोषण आणि सिकलसेलवरील उपाययोजनांचा आढावा घेतल्यानंतर आरोग्यमंत्र्यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला.

या नव्या घोषणेनुसार, आरोग्य सेवा अधिक कार्यक्षम करण्यासाठी अनेक पावले उचलली जातील,

रुग्णवाहिका सेवा सक्षम होणार, १०८ रुग्णवाहिका सेवेतील तक्रारींवर त्वरित कारवाई केली जाणार असून, ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत नव्या रुग्णवाहिका दाखल होतील, प्रत्येक मतदारसंघात आरोग्य सेवांवर थेट लक्ष ठेवण्यासाठी व्हॉट्सप ग्रुप तयार केला जाईल, ज्यात स्थानिक आमदार आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी असतील.

जिल्ह्यात चिंताजनक असलेल्या सिकलसेल आणि कुपोषण या समस्यांवर संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी रिक्त पदे आणि ओपीडी तसेच एएनएम पदे तातडीने भरण्याची मागणी मान्य करण्यात आली आहे.

बोगस डॉक्टर्स आणि भोंदू बाबांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या सर्व उपाययोजनांमुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यास मदत होईल आणि नागरिकांना याचा थेट फायदा मिळेल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

# बॅनरची मोडतोड केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**गौतम बचुटे । केज**

एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे शुभेच्छा होर्डिंग फाडल्या प्रकरणी एका तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. १ सप्टेंबर रोजी चिंचोली माळी ता. केज येथील भाजपचे कार्यकर्ते सुनिल गलांडे यांची बीड जिल्हा भाजपच्या सचिवपदी निवड झाल्या बद्दल त्यांना शुभेच्छा देणारे अभिनंदनाचे होर्डिंग चिंचोली माळी येथील संत नामदेव महाराजांच्या मंदिरा समोर लावण्यात आले होते.दरम्यान दि. ९ सप्टेंबर रोजी गावातील तरुण रोहन गलांडे याने ते बॅनर खाली काढून त्याची मोडतोड केली. तसेच त्याच्या या कृती बद्दल त्याला रवींद्र गलांडे यांनी जाब विचारला असता त्याने त्यांना शिवीगाळ केली.

या प्रकरणी रवींद्र गलांडे यांच्या फिर्यादी वरून रोहन गलांडे याच्या विरुद्ध एन. सी. ९९८/२०२५ भा. न्या. सं. ३२४(४), ३२५१(२), ३५२ नुसार केज पोलिस ठाण्यात दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार बाबासाहेब बांगर हे तपास करीत आहेत.

**विविध कार्यक्रमा निमित्त लावलेल्या बॅनर या संदर्भात बॅनर्स छपाई करणारे आणि ते लावणारे यांची बैठक घेण्यात आली असून विनापरवानगी लावलेल्या बॅनर्स व होर्डिंग्ज या बाबत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याच्या सूचना दिलेल्या आहे. उल्लंघन करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.**
**-पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलिस ठाणे केज**

## शेतकऱ्यांना दिलासा, खरीप हंगामातील ई-पीक पाहणीसाठी मुदतवाढ

# १४ सप्टेंबरऐवजी २० सप्टेंबरपर्यंत संधी; शेतकऱ्यांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी-तहसीलदार सचिन मुळीक

**मोहोळ । प्रतिनिधी**

खरीप हंगामातील महत्त्वाची प्रक्रिया असलेल्या ई-पीक पाहणीसाठी शासनाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. याअंतर्गत १४ सप्टेंबरपर्यंत असलेली अंतिम मुदत आता २० सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तहसीलदार सचिन मुळीक यांनी या निर्णयाची माहिती देत सर्व शेतकऱ्यांना वेळेत पाहणी करून घेण्याचे आवाहन केले आहे.मुळीक म्हणाले की, यंदा अतिवृष्टी, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करणे आव्हानात्मक ठरले. त्यातच ई-पीक पाहणी ॲप्लिकेशनमधील तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकरी या प्रक्रियेत मागे राहिले. या अडचणी लक्षात घेऊन शासनाने ही मुदतवाढ दिली आहे.ई-पीक पाहणी ही फक्त नोंदणी नसून पीक विमा, हमीभावाने शेतमाल विक्री, वन्यप्राण्यांच्या नुकसानीसाठी मिळणारा मोबदला तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अत्यावश्यक प्रक्रिया आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या वाढीव मुदतीचा फायदा घेत तातडीने नोंदणी पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले.यंदापासून सहाय्यकांद्वारे पाहणी करण्यासाठी मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात आली असून प्रति प्लॉट ५ रुपयांऐवजी १० रुपये दिले जाणार आहेत. तरीदेखील शेतकऱ्यांनी स्वतः ई-पीक पाहणी करणे अधिक फायदेशीर असल्याचे मुळीक यांनी स्पष्ट केले

# चंद्रपुर शिवसेनेच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वृद्धांना फळे वाटप



**भद्रावती । प्रतिनिधी**

शिवसेना नेत्या तथा विधानपरिषदेच्या उप-सभापती डॉ. निलम गोऱ्हे यांच्या वाढदिवसानिमित्त मिनल आत्राम जिल्हाप्रमुख शिवसेना महिला आघाडी चंद्रपुर, संतोष पारखी यांच्या नेतृत्वात चंद्रपुरातील उर्जानगर कोंडी जि. प. उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप तसेच देवाळा येथील डेबू सावली वृद्धाश्रमातील वृद्धांना फळवाटप करीत उत्साहात साजरा केला.

सदर कार्यक्रमाला बल्लारपुर विधानसभा महिला संघटिका कृष्णा सुरमवार, शिवसेना उपतालुका प्रमुख विक्की महाजन, भद्रावती युवासेना उपशहर प्रमुख विवेक दुर्गे, शिवसैनिक योगेश मुऱ्हेकर, भद्रावती माजी नगरसेवक नाना दुर्गे आदी शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान 'सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र'

**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतींना अधिक सक्षम आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने नंदुरबार जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्यात आले आहे. 'सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र' या ध्येयवाक्यासह राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. या अभियानामुळे ग्रामीण भागातील विकासाला गती मिळणार असून, यातून गावांमध्ये सुशासन, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानात एकूण सात मुख्य घटकांचा समावेश आहे: सुशासन: लोकाभिमुख प्रशासन आणि ऑनलाइन सेवांवर भर. संस्थात्मक सक्षमीकरण: ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी यांसारख्या स्थानिक संस्थांची गुणवत्ता सुधारणे. लोकसहभाग: श्रमदान आणि लोकसहभागातून गावातील मूलभूत सुविधांची निर्मिती. पर्यावरण संवर्धन: जलव्यवस्थापन, वृक्षारोपण, आणि कचरा व सांडपाणी व्यवस्थापनावर भर. योजनांचे अभिसरण: मनरेगा आणि इतर योजनांच्या माध्यमातून शेती व जलसंवर्धनाला चालना. आर्थिक स्वावलंबन: ग्रामपंचायतींचे स्वतःचे उत्पन्न वाढवण्यासाठी कर वसुलीवर भर. सामाजिक न्याय: प्रधानमंत्री आवास योजना, बचत गट आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन. विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकारणार 'विकसित महाराष्ट्र २०४७' हे ध्येय समोर ठेवून पंचायतराज संस्थांना अधिक गतिमान करणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यातून ग्रामपंचायतींमध्ये



विकासाची निरोगी स्पर्धा निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे. विविध सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून या अभियानाला एक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांना प्रोत्साहन देण्यासाठी अभियानांतर्गत एकूण १९०२ पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यासाठी सुमारे २४५.२० कोटी रुपयांचा निधीउपलब्ध करून देण्यात आला आहे. ग्रामपंचायतींसाठी: राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी, विभाग स्तरावर १ कोटी, जिल्हा स्तरावर ५० लाख आणि तालुका स्तरावर १५ लाख असे आकर्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या पंचायत समितीला २ कोटी आणि विभाग स्तरावर १ कोटी पुरस्कार मिळेल. राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटींचा पुरस्कार ठेवण्यात आला आहे. या अभियानामुळे ग्रामपंचायतींना स्वयंपूर्णता आणि शाश्वत विकासाचा मार्ग मिळणार असून, 'सशक्त पंचायत' या संकल्पनेतून खऱ्या अर्थाने 'समृद्ध महाराष्ट्राचे' स्वप्न प्रत्यक्षात येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी आपल्या नजीकच्या पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077